३ ऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !
पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com
# रयत समाचार
खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

ईश्वर टी अँण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी
प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४५९ वा ● मंगळवार, ता. ०२ डिसेंबर २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## आदर्श समाज निर्मितीसाठी शेजारधर्म पुनरुज्जीवनाची गरज

### जमाअत-ए-इस्लामी हिंद सार्वजनिक परिषद




**मडगाव । रयत समाचार**

'आदर्श शेजार, आदर्श समाज' या विषयावर आधारित सार्वजनिक परिषद जमाअत-ए-इस्लामी गोवा यांच्या वतीने आदर्श कन्व्हेन्शन हॉल, मडगाव येथे आयोजित करण्यात आली. देशभर राबविण्यात आलेल्या १० दिवसीय मोहिमेच्या समारोपाचा हा कार्यक्रम होता. या परिषदेत फा. रामिरो लुईस (माजोर्दा ग्राम), मीनाझ बानू, स्वामिनी गोपिकानंदा सरस्वती (चिन्मय कृष्ण आश्रम), फा. गॅब्रिएल कौटिन्हो (पुरोहित, नावेळिम गाव), आसिफ हुसेन (अध्यक्ष, जईहिं गोवा), शेख बशीर (अध्यक्ष, असोसिएशन ऑफ ऑल गोवा मुस्लिम जमात्स) तसेच प्रमुख पाहुणे सलीम इंजिनिअर, उपाध्यक्ष जईहिं इंडिया यांचा सहभाग होता.

परिषदेत व्यक्त करण्यात आलेल्या सामायिक चिंतेनुसार, आजची माणसे भौतिकदृष्ट्या जवळ राहत असली तरी भावनिक अंतर आणि सामाजिक दुरावा वाढत चालला आहे. तंत्रज्ञान आणि सोशल मीडियामुळे जागतिक पातळीवर जरी लोक जुळले असले, तरी प्रत्यक्ष शेजारीपाजारी संवाद मात्र कमी झाला असून, त्याचा परिणाम समाजाच्या पायाभरणीवर होत असल्याचे वक्त्यांनी नमूद केले.

चर्चेदरम्यान शेजारधर्म हे शांत आणि सशक्त राष्ट्राचे भक्कम पाया असल्याचे अधोरेखित करण्यात आले. नम्रता, सहकार्य, मदत, आपुलकी यांसारख्या छोट्या कृती विश्वास, सौहार्द आणि ऐक्य वाढविण्यात निर्णायक ठरतात, असे वक्त्यांनी सांगितले. सर्व धर्म आणि मूल्यप्रणाली शेजाऱ्यांप्रती करुणा, जबाबदारी आणि काळजी हेच संदेश देतात, याकडेही लक्ष वेधण्यात आले.

परिषदेत वाढता व्यक्तिवाद, असुरक्षितता आणि परस्पर सन्मानात घट यावरही चर्चा झाली. नागरिकांनी सहानुभूती पुन्हा जागवणे, संवाद मजबूत करणे आणि स्थानिक समुदायांमध्ये अधिक सक्रिय सहभाग घेणे याची गरज वक्त्यांनी मांडली. शेजारधर्म मजबूत असेल तर सामाजिक सौहार्द, न्याय आणि एकत्रित कल्याण साध्य होते, यावर एकमत व्यक्त झाले.

कार्यक्रमाचा समारोप शेजारधर्म पुनरुज्जीवनासाठी सजग प्रयत्न करण्याचे आवाहन करून झाला. स्थानिक पातळीवर सामुदायिक उपक्रम राबविणे, संयम, क्षमा आणि सद्भावनेची वृत्ती स्वीकारणे, या मूल्यांमुळेच आदर्श समाजाची निर्मिती शक्य होईल, असा संदेश देण्यात आला.

## मतदारांना प्रलोभनं; अजित पवार, एकनाथ शिंदेसह २० नेत्यांची अडचण

### निवडणूक आयोगाकडून चौकशीचे आदेश



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रचारसभांमधील भाषणांचा सूर चढता आहे. मात्र काही प्रमुख नेत्यांनी मतदारांना थेट आकर्षित करण्याचा किंवा प्रलोभन दाखवण्याचा सूर लावत केलेली काही विधानं आता त्यांच्या अडचणीत भर टाकू शकतात. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, मंत्री गुलाबराव पाटील, भाजपा नेत्या चित्रा वाघ, जयकुमार गोरे, संजय शिरसाठ यांच्यासह एकूण २० नेत्यांच्या वक्तव्यांची निवडणूक आयोगाकडून गंभीर दखल घेण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने या सर्व नेत्यांच्या विधानांचा तपशील संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून तातडीने मागवला आहे. ज्या ज्या भागात प्रचारसभा झाल्या, तेथे आयोगाचे निरीक्षक आणि कॅमेरे उपस्थित होते. त्यामुळे या विधानांची अधिकृत नोंद आयोगाकडे उपलब्ध आहे. त्या आधारे चौकशी आणि पुढील कारवाई केली जाणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

यामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेले ''निधीला कात्री लावू'' वक्तव्य, मंत्री गुलाबराव पाटील यांचे ''लक्ष्मी दर्शन होणार'', तर मुख्यमंत्री गटप्रमुख एकनाथ शिंदे यांनी ''तिजोरीच्या चाव्या'' असा उल्लेख करत मतदारांना संकेत दिल्याचा आरोप आहे. त्यासोबतच चित्रा वाघ यांच्या जोरदार चर्चेत आलेल्या ''खा कुणाचं पण मटण दाबा कमळाचं बटण'' या वाक्याचा देखील तपास सुरू आहे.

निवडणूक आयोगाच्या आचारसंहितेनुसार, मतदारांना कोणत्याही प्रकारे आर्थिक, सामाजिक, धार्मिक किंवा विकासाच्या आश्वासनाद्वारे थेट प्रभावित करणे हा आचारसंहितेचा भंग मानला जातो. याबाबत निवडणूक आयोगाने पूर्वीच सर्व राजकीय पक्षांना इशारा देऊन संयम राखण्याचं आवाहन केलं होतं. प्रचारसभांमध्ये होत असलेल्या भाषणावर आयोगाकडून आता बारकाईने नजर ठेवली जात असून, एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की, ''आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्याविरोधात कठोर कारवाईच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## संतविचारांचे संविधानात प्रतिबिंब

## पूर्ण अंमलबजावणी परिवर्तनाचा मार्ग- न्या. कोळसे पाटील

**पिंपरी । रयत समाचार**




**संविधानाची अंमलबजावणी होत नसल्याने प्रश्न वाढले**
संविधानाची पूर्ण अंमलबजावणी सत्ताधाऱ्यांकडून होत नसल्यामुळेच अनेक सामाजिक-राजकीय प्रश्न निर्माण होत आहेत. परिवर्तनासाठी संविधाननिष्ठ चळवळींची गरज अधिक आहे.
**- न्यायमूर्ती बी.जी. कोळसे पाटील**

महाराष्ट्रातील संत परंपरेने समाजाला समता, बंधुता आणि न्यायाचा मार्ग दाखवला. जातीभेद-उच्चनीचता नाकारत स्त्री-पुरुष समानतेची भूमिका त्यांनी जोपासली. या संतविचारांचा प्रभावच भारतीय संविधानाच्या तत्त्वज्ञानात दिसतो आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संविधान जगात सर्वश्रेष्ठ ठरते, असे प्रतिपादन निवृत्त न्यायमूर्ती बी.जी. कोळसे पाटील यांनी केले.

पिंपरी-चिंचवड येथे मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, छावा मराठा युवा महासंघ, संविधान जागर अभियान, संविधान सजगता मंच अशा विविध सामाजिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन निमित्त संत स्वराज्य-संविधान संगीत प्रवचन कार्यक्रमाचे आयोजन चैतन्य सभागृहात करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात महामानवांच्या प्रतिमेस अभिवादन करून झाली. जिजाऊ ब्रिगेडच्या रत्नप्रभा सातपुते यांनी जिजाऊ वंदना सादर केली. धनाजी येळकर पाटील (छावा महासंघ) यांनी संविधान उद्देशिका वाचन केले तर प्रास्ताविक मारूती भापकर यांनी केले.

यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक मानव कांबळे आणि लोकायत सांस्कृतिक मंचच्या स्नेहल बी.एस. यांनी मनोगते व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रकाश जाधव (मराठा सेवा संघ) यांनी केले. लोकायत सांस्कृतिक मंचचे शुभम, अक्षय, श्रीकृष्ण व टीमने संत स्वराज्य-संविधान संगीत प्रवचन सादर करत संतांच्या अभंगांचे सुंदर निरूपण केले. संतांनी मांडलेले सर्व धर्म समभाव आणि त्याचे संविधानातील प्रतिध्वनी यावर त्यांनी उदाहरणासह प्रकाश टाकला. कार्यक्रमाला कामगार नेते काशिनाथ नखाते, मराठा सेवा संघ शहराध्यक्ष आबासाहेब ढवळे, संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष प्रविण कदम, छावा सेनेचे जिल्हाध्यक्ष राहुल धस, आपचे विक्की पासोटे, जिजाऊ ब्रिगेड अध्यक्षा सुलभा यादव, अश्विनी पाटील, प्रदीप पवार, प्रताप गुरव, सिद्धिकभाई शेख, रूहीनाज शेख, ॲड. लक्ष्मण रानवडे, आनंदा कुदळे, सुरेश गायकवाड, सचिन दोनगहू, विलास पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संभाजी ब्रिगेडचे उपाध्यक्ष निरंजन सोखी, संतोष बादाडे, अशोक सातपुते, ऋषीकेश कापडी, जयंत गायकवाड यांनी परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सतीश काळे यांनी केले.

## राज्य निवडणूक आयोगाचा खुलासा

## नगराध्यक्षपदावरील वादांमुळे काही निवडणुका पुढे ढकलल्या

**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्रातील नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकांपैकी काही निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगानं घेतला असून, त्यामागील कारणांवर आयोगानं स्पष्टीकरण दिलं आहे. ज्या ज्या ठिकाणी नगराध्यक्ष पदासंदर्भात तक्रारी किंवा आक्षेप नोंदवले गेले आहेत, त्या ठिकाणच्याच निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या असल्याचं सांगितलं आहे.

पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यासह हिल्यानगर जिल्ह्यातील १२ पैकी ४ नगरपरिषदांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. आयोगाच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, विविध कायदेशीर प्रक्रिया आणि कोर्टातील अपील लक्षात घेऊनच निवडणूक प्रक्रिया थांबवण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगानं दिलेल्या माहितीनुसार, २४ नगरपालिका आणि जवळपास १५० सदस्यांच्या निवडणुकीवर मात्र कोणताही परिणाम होणार नाही. त्या निवडणुका नियोजनाप्रमाणे २० डिसेंबर रोजीच होणार आहेत.

१७(१)(ब) तरतुदीनुसार, उमेदवाराने कोर्टात अपील केल्यास त्याला अर्ज मागे घेण्यासाठी ठराविक वेळ देणं कायदेशीरदृष्ट्या आवश्यक असल्याचं आयोगानं स्पष्ट केलं. तो कालावधी न दिल्यास निवडणूक प्रक्रियेवर विपरित परिणाम होऊ शकतो आणि अखेर संपूर्ण निवडणुका स्थगित करण्याची वेळ येऊ शकते, असंही सांगण्यात आलं.

ज्या ठिकाणी निवडणुका पुढे ढकलल्या आहेत, त्या ठिकाणच्या निवडणुकीच्या अधिकाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कारणे दाखवा नोटीस पाठवण्याची प्रक्रिया सुरू असून, या निवडणुकांमध्ये नव्या उमेदवारांना अर्ज भरता येणार नाही. मात्र, आधी भरलेले अर्ज मागे घेण्याची मुभा असेल, अशी माहिती आयोगानं दिली. राज्य निवडणूक आयोगानं नगराध्यक्ष आणि सदस्यांच्या प्रचार खर्चाबाबतचा अंतिम निर्णय अद्याप राखून ठेवला असून, याबाबत लवकरच निर्णय जाहीर होणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. यासाठी आज राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक पार पडली.

दरम्यान, ज्या नगराध्यक्ष पदांसाठी थेट जनतेतून निवड प्रक्रिया होणार आहे, त्या ठिकाणी एकदाच मतदान होणार असून, काही प्रभागांच्या निवडणुका पुढे ढकलल्यामुळे त्या ठिकाणी दुसऱ्यांदा मतदान करावं लागणार असल्याचं आयोगानं नमूद केलं.

## भारत सरकारचा महत्वाचा आदेश

## सर्व मोबाईलमध्ये 'संचार साथी' ॲप अनिवार्य

**नवी दिल्ली । रयत समाचार**

मोबाईल वापरकर्त्यांचे सायबर सुरक्षेपासून संरक्षण करण्यासाठी भारत सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. देशात विक्री होणाऱ्या प्रत्येक स्मार्टफोनमध्ये सरकारी 'संचार साथी' हे सायबर सेफ्टी ॲप अनिवार्यपणे प्री-इन्स्टॉल करावे, आणि ते वापरकर्त्यांना डिलीट करता येऊ नये, अशा स्पष्ट सूचना दूरसंचार मंत्रालयाने मोबाईल कंपन्यांना दिल्या आहेत. मंत्रालयाकडून अद्याप अधिकृत घोषणा नसली तरी हा आदेश २८ नोव्हेंबर रोजी जारी झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, मोबाईल उत्पादक कंपन्यांना हे ॲप प्री-लोड करण्यासाठी ९० दिवसांची मुदत देण्यात आली आहे. तसेच आधीपासून वापरात असलेल्या स्मार्टफोनमध्येही सॉफ्टवेअर अपडेटद्वारे हे ॲप इंस्टॉल करावे लागणार आहे.

भारतामध्ये ११२ कोटींहून अधिक मोबाईल वापरकर्ते आहेत आणि देश जगातील सर्वात मोठ्या मोबाईल फोन उत्पादकांपैकी एक आहे. संचार साथी हे सरकारद्वारे विकसित केलेले ॲप असून मोबाईल चोरी, बोगस फोन विक्री, काळ्या बाजारात जाऊन पुन्हा सक्रिय होणाऱ्या उपकरणांवर नियंत्रण ठेवण्यासाठी हे ॲप प्रभावी ठरते. सरकारच्या आकडेवारीनुसार आतापर्यंत ७ लाख चोरीचे अथवा हरवलेले मोबाईल या ॲपच्या मदतीने शोधण्यात आले असून त्यातील ५० हजार मोबाईल फक्त ऑक्टोबर महिन्यात परत मिळाले आहेत. हे ॲप दूरसंचार विभागाने २०२३ मध्ये लॉन्च केले होते. तथापि, ॲपल कंपनीचे धोरण थर्ड पार्टी ॲप प्री-इन्स्टॉलेशनला परवानगी देत नसल्याने आयफोनमध्ये हे ॲप बसवण्याबाबत प्रश्नचिन्ह कायम आहे. गुगल, ॲपल, सॅमसंग आणि शाओमी यांनी अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका जाहीर केलेली नाही.

सरकारच्या या नव्या निर्णयामुळे देशातील मोबाईल वापरकर्त्यांना सायबर सुरक्षेच्या दृष्टीने मोठे संरक्षण मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## आनंदवाडीत रंगणार कुस्त्यांचा थरार

### प्रसिद्धी पत्रकाचे प्रकाशन



**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

मध्यवर्ती कुस्तीगीर संघटना, बेळगाव यांच्या वतीने रविवार, ता. ४ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता आनंदवाडी येथील प्रसिद्ध कुस्ती मैदानात मोफत निकाली कुस्त्यांचे जंगी कुस्ती मैदान आयोजित करण्यात आले आहे. या जंगी मैदानाच्या प्रसिद्धी पत्रकाचे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन करण्यात आले.

यावेळी बोलताना वाय. पी. नाईक म्हणाले की, लाल मातीतील परंपरागत कुस्ती जिवंत राहावी, तरुणांना प्रोत्साहन मिळावे तसेच ग्रामीण भागातील खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या हेतूने दरवर्षी हे कुस्ती मैदान आयोजित केले जाते. या उपक्रमासाठी देणगीदारांनी भरीव आर्थिक मदत करावी, असे आवाहन त्यांनी केले.

या वर्षीच्या कुस्ती मैदानातील पहिली आकर्षक कुस्ती युनिव्हर्सिटी ब्ल्यू प्रेम जाधव (कंग्राळी) विरुद्ध पंजाब केसरी गुरुजीत सिंग यांच्यात रंगणार आहे. तसेच महिला कुस्तींचेही विशेष आयोजन करण्यात आले असून, बेळगावच्या कुस्तीप्रेमींना नवीन वर्षाच्या प्रारंभीच मोफत निकाली कुस्त्या पाहण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे.

या प्रसिद्धी पत्रक प्रकाशन सोहळ्यास कुस्तीगीर संघटनेचे आधारस्तंभ व माजी आमदार परशुरामभाऊ नंदिहळ्ळी, संघटनेचे अध्यक्ष मारुती घाडी, उपाध्यक्ष महादेव पाटील, सचिव संतोष होनगल, खजिनदार भरमा पुणजगौडा, संचालक विनोद चौगुले, वाय. पी. नाईक, हिरालाल चव्हाण, विलास घाडी, वैभव खाडे, नंदकुमार कंग्राळकर, संजय मुतगेकर, कोमाणी कुन्नुरकर, परशुराम पाटील, सदाशिव तळवार, बसू कुपाणी आदी सदस्य उपस्थित होते.

यावेळी उपस्थित सर्व सदस्यांनी संघटनेच्या वतीने सलग पंधराव्या वर्षी आयोजित करण्यात आलेले हे कुस्ती मैदान भव्यदिव्य आणि यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला. रयत समाचार

## कविता मोरवणकर यांच्या उद्याचा दहशतगर्द अंधार कवितासंग्रहाचे प्रा.डॉ.पवार यांच्या हस्ते प्रकाशन

**वसई । भूषण तांबे**



प्रख्यात कवयित्री कविता मोरवणकर लिखित उद्याचा दहशतगर्द अंधार या कवितासंग्रहाचा भव्य प्रकाशन सोहळा वसई येथे मोठ्या उत्साहात पार पडला. समाज साहित्य प्रतिष्ठान, सिंधुदुर्ग आणि सहयोग संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पाचव्या समाज, साहित्य व भाषा विचार संमेलनात या संग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ भाषा अभ्यासक प्रा. डॉ. दीपक पवार यांच्या हस्ते झाले.

राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविण्यात आलेल्या कवयित्री कविता मोरवणकर या शिक्षिका, साहित्यिक, समाजकार्यकर्त्या आणि कुशल अभिनेत्री म्हणून बहुआयामी व्यक्तिमत्व आहेत. शिक्षण, साहित्य, नाट्य व चित्रपट या सर्वच क्षेत्रांत केलेल्या त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव या कार्यक्रमात व्यक्त करण्यात आला.

सोहळ्याची सुरुवात प्रा. डॉ. पवार यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार झाला. प्रास्ताविकानंतर कवितासंग्रहाचे औपचारिक प्रकाशन संपन्न झाले.

आपल्या मनोगतात कवयित्री मोरवणकर यांनी संग्रहामागील प्रेरणा, विचारप्रक्रिया आणि आठवणी सांगताना श्रोत्यांना भावूक केले. उपस्थित रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे अभिनंदन केले.

सोहळ्यास प्रभा प्रकाशनाचे संचालक व कवी अजय कांडर यांच्यासह अनेक दिग्गज मान्यवरांची उपस्थिती लाभली. त्यांच्या सान्निध्यात हा कार्यक्रम उत्साहात, शिस्तबद्ध आणि अतिशय यशस्वीरीत्या पार पडला.

वसईच्या साहित्यिक वातावरणात नवचैतन्य निर्माण करणारा हा प्रकाशन सोहळा रसिकांच्या मनात कायम स्मरणात राहील, अशी सर्वांची भावना होती. रयत समाचार




**बेटी बचाओ, बेटी पढाओ!**

# इंग्रजी शाळांच्या क्रीडा स्पर्धांचा प्रतिसाद कौतुकास्पद– डॉ. तायडे

## मेस्टा नगर शहर व तालुका संघटनेचा उपक्रम

**अहमदनगर । रयत समाचार**

शहर व तालुका मेस्टा संघटनेच्या वतीने साई इंग्लिश मीडियम स्कूल, नवनागापूर येथे आयोजित आंतरशालेय मैदानी क्रीडा स्पर्धांना दहा इंग्रजी माध्यम शाळांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. इंग्रजी शाळांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांसाठी निर्माण केलेले क्रीडा व्यासपीठ त्यांच्या गुणांना नक्कीच वाव देणारे ठरेल, असे प्रतिपादन मेस्टा संघटनेचे राज्याध्यक्ष डॉ. संजय तायडे पाटील यांनी उद्घाटनप्रसंगी केले.




कार्यक्रमाला राजू नगरकर, दक्षिण अध्यक्ष देविदास गोडसे, माऊंट लिट्रा स्कूलचे सुनील लोटके, मीराज स्कूलच्या सौ. बारस्कर, साई इंग्लिश स्कूलचे आदर्श ढोरजकर, माऊली स्कूल शेंडीच्या सविता वाव्हळ, लिटिल फ्लावर स्कूल खारेकर्जूनेचे नरवडे, डॉ. शरद कोलते स्कूल पारगावचे प्रा. विजय शिंदे, जीनियस ग्लोबल स्कूलचे जगदीश देशमुख, ब्ल्यू डायमंड अकॅडमीचे सुजित डोंगरे, राउ इंग्लिश मीडियम स्कूल खारेकर्जूनेच्या दीपाली झंजाड, ज्ञानदीप प्रीस्कूलचे कातोरे सर आदी विश्वस्त उपस्थित होते. स्पर्धेत पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी बुक बॅलन्स, धावणे, रिले, फ्रॉग जंप अशा आकर्षक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व पदके देऊन गौरवण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ. तायडे पाटील म्हणाले, मेस्टा संघटना राज्यभर शैक्षणिक क्षेत्रात काम करत आहे. शहर व तालुक्यातील इंग्रजी शाळांनी अशा उपक्रमांतून सातत्याने एकत्र येणे हा संघटनात्मक दृष्टीनेही सकारात्मक पाऊल आहे. विद्यार्थ्यांसाठी हे उत्तम व्यासपीठ ठरेल. कार्यक्रमात पाहुण्यांचा परिचय व सत्कार ॲड. सुनील लोटके यांनी केला. विश्वस्तांच्या सभेत आगामी महिन्यात सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजित डोंगरे, गोरक्षनाथ नरवडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. विजय शिंदे यांनी मानले.

# ड्रेनेज लाईन व रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन

## माजी नगरसेविका दिपाली बारस्कर यांच्या प्रयत्नांतून कामांना गती

**अहमदनगर । रयत समाचार**

प्रभाग क्रमांक १ च्या माजी नगरसेविका दिपाली बाळासाहेब बारस्कर यांच्या प्रयत्नातून माऊलीनगर परिसरातील ड्रेनेज लाईन व रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन भाऊसाहेब गाडे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमास माजी नगरसेविका दिपाली बारस्कर, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब बारस्कर, माजी नगरसेवक सतीश बारस्कर, विलास नाबदे, राजेश टाक, रामकिसन सुपेकर, सुनील डोंगरे, धनंजय रासकर, राजेंद्र शिंदे, महेश तोडमल, गणेश नरवडे, पालवे सर तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी बोलताना माजी नगरसेविका दिपाली बारस्कर म्हणाल्या, ''तपोवन रोड परिसरातील नागरिकांच्या विश्वासास पात्र ठरत गेल्या पंधरा वर्षांपासून नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी विकासकामे राबविल्याने हा परिसर आज विकसित भाग म्हणून ओळखला जातो. पिण्याच्या पाण्याच्या लाईन, बंद पाईप गटारी यांसारखी जमिनीअंतर्गत कामे पूर्ण केल्यानंतरच रस्ता कॉंक्रिटीकरण केले जाते. एकदा केलेली कामे पुन्हा खोदावी लागू नयेत, हा आमचा प्रयत्न आहे.''

बाळासाहेब बारस्कर म्हणाले, ''महापालिकेची आर्थिक परिस्थिती मर्यादित असतानाही आम्ही प्रभागातील अनेक विकासकामांना गती दिली आहे. आमदार संग्राम जगताप यांनी राज्य शासनाकडून मोठा निधी उपलब्ध करून दिल्याने नागरिकांचे बहुतांश प्रश्न मार्गी लागले आहेत. विकासकामांमुळे प्रभागातील प्रत्येक कुटुंबाशी विश्वासाचे नाते दृढ झाले आहे.''

ते पुढे म्हणाले, ''लेखानगर परिसरातील १२ अंतर्गत रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाची कामे लवकरच सुरू होणार असून त्याआधी बंद पाईप गटारीची कामे पूर्ण केली जातील. या कामांसाठीही महत्त्वपूर्ण निधी प्राप्त झाला आहे.''

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील डोंगरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विलास नाबदे यांनी मानले.

## कुंदनलाल तिलकचंद वासन चॅरिटेबल ट्रस्टचा उपक्रम

# निराधार व वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना ब्लॅंकेट वाटप

**अहमदनगर । रयत समाचार**

''सामाजिक बांधिलकी जपताना वंचित घटकांना मदतीचा हात देणे आवश्यक आहे. ज्यांना सर्व काही लाभले आहे, त्यांनी समाजासाठी हात पुढे करणे ही खरी दातृत्वाची भावना आहे. अंतिम ध्येय पैसा नसून दातृत्वातून मिळणारे समाधान हेच सर्वात मोठे यश आहे,'' असे प्रतिपादन पद्मश्री पोपट पवार यांनी केले.



श्री कुंदनलाल तिलकचंद वासन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने, वासन उद्योग समूहाचे चेअरमन विजय वासन व तरुण वासन यांच्या मार्गदर्शनाखाली थंडीनिमित्त मानवतावादी उपक्रम राबविण्यात आला. तपोवन रोड येथील अपंग संजीवनी मतीमंद मुलांची निवासी शाळा, केडगाव येथील सावली संस्था (अनाथ व निराधार विद्यार्थी), घर घर लंगर सेवा तसेच मुकुंदनगर येथील संबोधी विद्यार्थी वस्तीगृह (चेतन हॉस्टेल) येथील विद्यार्थ्यांसाठी १०० बेडशीट आणि २०० ब्लॅंकेटचे वाटप करण्यात आले.

केडगाव एमआयडीसी येथील वासन टोयोटा शोरूममध्ये झालेल्या या कार्यक्रमात पद्मश्री पवार मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाला आमदार संग्राम जगताप, वासन टोयोटाचे जनक आहुजा, अनिश आहुजा, पर्यावरण कार्यकर्ते अमेय साठे (दिल्ली), आनंदऋषी नेत्रालयाचे डॉ. आनंद छाजेड, डॉ. सुमित शिंदे, डॉ. कुंडलिक राठोड, कमल गायकवाड, नेत्रदूत जालिंदर बोरुडे, घर घर लंगर सेवेचे हरजीतसिंग वधवा, प्रीतपालसिंग धुप्पड, दिलीप डुंगुरवाल, अमेय साठे, जनकल्याण रक्तपेढीच्या डॉ. मीना फुके, डॉ. सोनाली खांडरे, नितेश बनसोडे, राकेश गुप्ता, संजय आहुजा आणि वासन परिवारातील सदस्य उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना जनक आहुजा म्हणाले, ''श्री कुंदनलाल तिलकचंद वासन चॅरिटेबल ट्रस्टमार्फत शहरात अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. कोरोना काळातही घर घर लंगर सेवेद्वारे मदत करण्यात आली. व्यवसायासोबत सामाजिक बांधिलकी जपणे ही आमची प्राथमिकता आहे.''

उपक्रमाबद्दल लाभार्थी संस्थांच्या प्रतिनिधींनी ट्रस्टचे मनःपूर्वक आभार मानले.

# दत्त जयंतीनिमित्त १११ युवकांचे रक्तदान

## सुर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठानचा उपक्रम

**अहमदनगर । रयत समाचार**

दातरंगे मळा परिसरातील दत्त कॉलनीमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री दत्त जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. श्री सुर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित या शिबिरात यंदा तब्बल १११ युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रक्तदान केले. समाजसेवेचा हा उत्कृष्ट आदर्श ठरला असून ५ महिलांनीही रक्तदान करून विशेष सहभाग नोंदवला. दातरंगे मळा तसेच नगर शहरातील अनेक युवकयुवती आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराला उत्साहपूर्ण प्रतिसाद दिला.



आनंदऋषीजी रक्तपेढीचे सुनील महानुर यांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले, ''रक्तदान करून आपण एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करतो. रक्त कोणत्याही कारखान्यात तयार होत नाही, त्यामुळे प्रत्येक सक्षम व्यक्तीने वर्षातून किमान एकदा रक्तदान करणे आवश्यक आहे.'' प्रतिष्ठान गेली २३ वर्षे सातत्याने रक्तदान शिबिरे आयोजित करत असल्याचे त्यांनी कौतुकपूर्वक सांगितले. धार्मिक कार्यक्रमांसह सामाजिक बांधिलकी जपण्याची परंपरा प्रतिष्ठानने कायम ठेवली आहे. रक्तदान शिबिरासोबतच महिलांच्या आरोग्याची काळजी घेत १७५ महिलांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. या उपक्रमासाठी आनंदऋषीजी ब्लड बॅंकेचे विशेष सहकार्य लाभले.

प्रास्ताविकात सतीश चिंता व श्रीनिवास इप्पलपेल्ली यांनी प्रतिष्ठानच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. ''दत्त जयंती निमित्त दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या रक्तदान शिबिराचा उद्देश रक्ताच्या तुटवड्याची पूर्तता करून जीव वाचविण्यासाठी योगदान देणे हा आहे. युवकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे दत्त जयंतीचा सामाजिक संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचतो,'' असे ते म्हणाले.

या उपक्रमांतर्गत वर्षभर सामाजिक, सांस्कृतिक व जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्याची परंपरा प्रतिष्ठानने जपली असून यावर्षीदेखील विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दत्त जयंतीनिमित्त ४ डिसेंबर रोजी महाप्रसाद, धार्मिक कार्यक्रम तसेच सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार असून जास्तीत जास्त भक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष चंद्रकांत सब्बन आणि उपाध्यक्ष रमेश गुंडू यांनी केले. या उपक्रमाच्या यशासाठी प्रतिष्ठानचे सर्व कार्यकर्ते तसेच निलांबरी महिला मंडळाच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ३ डिसेंबरला गुणवंत दिव्यांग कर्मचारी गौरव सोहळा

## सहा दिवसांची विशेष नैमित्तिक रजा मंजूर– साहेबराव अनाप

**अहमदनगर । सलीमखान पठाण**

जागतिक अपंग दिनानिमित्त जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय विविध विभागातील गुणवंत कर्मचाऱ्यांचा गुणवंत दिव्यांग कर्मचारी पुरस्कार वितरण सोहळा बुधवार, ता. ३ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद सभागृह, येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव योगेश पैठणकर, शिक्षणाधिकारी भास्करराव पाटील, दादासाहेब गुंजाळ, शैलेश मोरे, राहुल शेळके, विवेक पाटील (संभाजीनगर), शिक्षक नेते बापूसाहेब तांबे आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा शिक्षक बॅंकेचे माजी चेअरमन साहेबराव अनाप यांनी दिली.दरवर्षीप्रमाणे यावर्षीही अपंग कर्मचारी संघटनेतर्फे दिव्यांग कर्मचारी मार्गदर्शन कार्यशाळा व पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. जिल्ह्यातील विविध विभागांमध्ये शारीरिक अडचणींवर मात करून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा या प्रसंगी सन्मान होणार आहे. तसेच अहमदनगर जिल्हा परिषदेने १ डिसेंबर ते ६ डिसेंबरदरम्यान सहा दिवसांची विशेष नैमित्तिक रजा मंजूर केली असून सर्व दिव्यांग कर्मचाऱ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कार्याध्यक्ष राजू आव्हाड व सचिव पोपटराव धामणे यांनी केले.गुणवंत दिव्यांग कर्मचारी पुरस्कार प्राप्त व्यक्ती पुढीलप्रमाणे : वैशाली साहेबराव शेळके (नागापूर), ज्योती एकनाथ जाधव (श्रीरामपूर), रोहिणी भगवानराव शिंदे (नेवासा), संजय अंबादास ठोकळ (कर्जत), विठ्ठल दगडू बांडे (मान्हेरे, अकोले), जिजाबाई गणपत बनकर (नांदूर दैत्य, पाथर्डी), अमोल वसंतराव कडू (कोपरगाव नगरपालिका), मंगल वसंत वामन (जवळके, कोपरगाव), हिराबाई पांडुरंग लटांबळे (आळकुटी), मेहबूब शेख (शेवगाव), एकनाथ साबळे (पोखरी हवेली, संगमनेर), रुपेश वाणी (धामणगाव, जामखेड), अशोक निवृत्ती दांगडे (मोरेवाडी, श्रीगोंदा), अलका बाळासाहेब शिंदे (विशेष शिक्षक, शेंडी), ज्योती बाळासाहेब तवले (महिला व बालकल्याण, पारनेर), संदीप जगन्नाथ आदमाने (कला शिक्षक, माध्यमिक विभाग), चांद कादर शेख, बाळू चेमटे (परिचर, आरोग्य विभाग) आदी गुणवंत कर्मचाऱ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरवण्यात येणार आहे.कार्यक्रमात दिव्यांग कर्मचाऱ्यांना साधने व उपकरणे वाटप, दिव्यांग कर्मचाऱ्यांचे प्रमोशन व सेवा–ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करणे, वाहन भत्त्याचे प्रस्ताव मंजूर करणे, सोयीने बदली प्रक्रिया राबवणे अशा विविध मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. या कार्यक्रमासाठी सर्व दिव्यांग कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राज्य सह–कोषाध्यक्ष संतोष सरवदे, कोषाध्यक्ष राजेंद्र औटी, श्रीकांत दळवी, उद्धव थोरात, बन्सी गुंड, राजेंद्र ठूबे, साहेबराव मूळे, रमेश शिंदे, विजय राऊत, अमोल चन्ने, किरण माने, शिवाजी आव्हाड, आबासाहेब बिडगर, गजानन मुंडलिक, अनिल घोलप, शिवाजी आव्हाड, सुनील मेचकर, भाऊराव नागरे, बळीराम जाधव, नारायण लहाने, खंडू बाचकर, अनिल ओहोळ, दादासाहेब गव्हाणे, रामकिसन डमाळे, विजय अंधारे, सचिन रनाते, अजय लगड आदींनी केले आहे.

## ५ डिसेंबरला 'शाळा बंद' आंदोलन

**अहमदनगर । रयत समाचार**

टीईटी सक्ती, अन्यायकारक संचमान्यता धोरण, अशैक्षणिक कामांची जबरदस्ती आणि प्रलंबित मागण्यांविरोधात ५ डिसेंबर २०२५ रोजी राज्यव्यापी 'शाळा बंद' आंदोलन होणार आहे. या आंदोलनात शिक्षक भारती सक्रीयपणे सहभागी होणार असल्याची माहिती राज्य सचिव सुनील गाडगे यांनी दिली. शिक्षकशिक्षकेतरांच्या प्रमुख मागण्या २०१३ पूर्वीच्या शिक्षकांना दिलासा, १५ मार्च २०२४ चा संचमान्यता जी.आर. रद्द, जुन्या पेन्शनची अंमलबजावणी, २०२० रद्द, कॅशलेस आरोग्य योजना, विषयानुसार स्वतंत्र शिक्षक, रिक्त पदांची भरती, विनाअनुदानित शाळांना १००% अनुदान, कंत्राटीकरण थांबवणे आदींचा समावेश आहे. शासनाने तातडीने सकारात्मक प्रतिसाद द्यावा, अशी मागणी शिक्षक भारतीने केली आहे.

आपला वाढदिवस रक्तदानाने साजरा करा

# खेड्यापासून शहरापर्यंत तरुण मैदानांवर; पोलीस भरतीची जय्यत तयारी

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

महाराष्ट्रात जाहीर झालेल्या पोलीस भरतीमुळे राज्यभर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून त्याचा सर्वाधिक प्रभाव शेवगाव तालुक्यात पाहायला मिळत आहे. तालुक्यातील प्रत्येक गावात, वाड्यापाड्यांत तसेच शहरातील मैदानांवर पहाटेपासून रात्रीपर्यंत शेकडो युवकयुवती शारीरिक चाचण्यांचा सराव करताना दिसत आहेत. धावणे, लांबउडी, उंचउडी, गोळाफेक, रनिंग ड्रिल्स, स्ट्रेचिंग अशा विविध शारीरिक कसोट्यांसाठी उमेदवारांची लगबग सुरू आहे. अनेक ठिकाणी महिलांसाठी स्वतंत्र बॅचेस घेतल्या जात असून मुलींचा उत्साहही उल्लेखनीय आहे.



शेवगाव शहरासह ठाकूर निमगाव, दहिगाव, आखेगाव, नागलवाडी, बोधेगाव, बालमटाकळी, अमरापूर, रानेगाव, कऱ्हेटाकळी आदी परिसरातील मैदानांवर पहाटेपासूनच गर्दी दिसून येते. पोलिस दलात भरती होण्याचे स्वप्न, जिद्द आणि मेहनत यांच्या जोरावर तरुणाई सरावाला स्वतःला झोकून देताना दिसते. या ऊर्मीमुळे संपूर्ण तालुक्यात नवचैतन्य निर्माण झाले आहे.

उमेदवारांच्या तयारीत गावकऱ्यांचे सहकार्यही विशेष उल्लेखनीय आहे. अनेक ठिकाणी माजी सैनिक, क्रीडा शिक्षक, निवृत्त अधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते मोफत मार्गदर्शन व प्रशिक्षण देत आहेत. कोणाचे घर सरावासाठी खुले, तर कोणाकडे स्टॉपवॉचची व्यवस्था अशा प्रकारे संपूर्ण तालुका उमेदवारांच्या पाठीशी उभा आहे. काही गावांमध्ये ग्रामस्थांनी पाणी, फळे, ऊर्जा पेय व नाश्त्याची सोय केल्याने तरुणांचे मनोबल वाढले आहे.

पोलीस भरतीसाठी ऑनलाइन फॉर्म भरण्याची मुदत सात दिवसांनी वाढवण्यात आली आहे. अनेक उमेदवारांची काही कागदपत्रे अपूर्ण असल्याने ते वेळेत फॉर्म भरू शकत नव्हते. मात्र मुदतवाढ मिळाल्याने संधी सर्वांना उपलब्ध होणार असल्याचा आनंद तरुणांच्या चेहऱ्यावर दिसून येतो.

पालकांचाही सहभाग तितकाच उत्साहवर्धक आहे. मुलांना सकस आहार, योग्य विश्रांती आणि सराव मिळावा यासाठी ते विशेष काळजी घेत आहेत. रोजगार, भविष्य आणि स्वावलंबनाचा विचार करता पोलिस दलात स्थान मिळावे, हे अनेक घरांचे स्वप्न बनले आहे. अनेक उमेदवारांनी ''या वेळी संधी गमावणार नाही'' असा निर्धार व्यक्त केला असून यंदाची भरती स्वतःसाठी निर्णायक असल्याचे सांगितले आहे

ठाकूर निमगावचे माजी सैनिक महादेव खेडकर म्हणाले, ''गावातील तरुणांमध्ये प्रचंड उत्साह दिसत आहे. थोडे मार्गदर्शन आणि शिस्त मिळाली तर हेच युवक लष्कर, पोलीस व शासकीय सेवांमध्ये नाव कमवू शकतात. त्यांचा आत्मविश्वास वाढवणे हेच माझे उद्दिष्ट आहे.''

उमेदवारांच्या अथक कष्टांमुळे तालुक्यातील अनेक तरुण येत्या काळात पोलिस दलात दाखल होतील, असा विश्वास सर्वत्र व्यक्त केला जात आहे.

# नगरपालिकेची निवडणूक पुढे ढकलली

## सर्वपक्षीय उमेदवारांचा हिरमोड

**पाथर्डी । नितीन गटाणी**

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या सुधारित अध्यादेशामुळे पाथर्डी नगरपालिकेची निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. या निर्णयामुळे सर्वपक्षीय उमेदवारांमध्ये तात्पुरती मरगळ आल्याचे चित्र दिसत असून काही दिवस तरी प्रचाराचा धुरळा खाली बसणार आहे. पुढील आठवड्यात प्रचार पुन्हा वेग घेईल, मात्र कार्यकर्ते आणि मतदारांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

राज्यातील न्यायप्रविष्ठ असलेल्या काही नगरपालिका व नगरपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम स्थगित करण्यात आला आहे. यात पाथर्डीसह कोपरगाव, देवळाली प्रवरा या तीन नगरपालिका आणि नेवासा नगरपंचायतीचा समावेश आहे. पाथर्डीत नगराध्यक्ष पदाचे उमेदवार तसेच प्रभाग क्र. ८ (अ) मधील उमेदवारांच्या अर्जांवरून प्रकरण न्यायप्रविष्ठ झाले होते. स्थानिक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी १८ नोव्हेंबर रोजी निकाल दिला होता; मात्र या निकालाविरोधात हरकती दाखल झाल्यानंतर जिल्हा न्यायालयाने २५ नोव्हेंबर रोजी निर्णय दिला.

निवडणूक आयोगाच्या नवीन अध्यादेशानुसार २२ नोव्हेंबरपर्यंत निकाल देणे आवश्यक होते. पाथर्डीतील दोन्ही उमेदवारांचा निकाल मात्र २५ नोव्हेंबर रोजी दिला गेल्यामुळे २ डिसेंबर रोजी होणारी निवडणूक आता २० डिसेंबर रोजी होणार आहे. मतमोजणी २१ डिसेंबर रोजी होईल. नियोजित कार्यक्रमाच्या तुलनेत मतदान १८ दिवस उशिरा होत असल्याने सर्व पक्षीय उमेदवार चिंताग्रस्त झाले आहेत. यापूर्वी मतदारांशी संपर्क साधून प्रचाराची आवश्यक तयारी पूर्ण झाली होती. प्रत्यक्ष मतदानाच्या काही तास अगोदर निवडणूक स्थगित झाल्याने आता पुन्हा १८ दिवस मतदारांशी संपर्क ठेवून वातावरण अनुकूल राखण्यासाठी उमेदवारांना मोठी कसरत करावी लागणार आहे.




**नवीन निवडणूक कार्यक्रम**

आचारसंहिता पूर्वीप्रमाणे लागूच आहे. दि. ४ ते १० डिसेंबर दरम्यान केवळ नगराध्यक्ष पदाचे आणि प्रभाग क्र. ८ (अ) मधील उमेदवारांना अर्ज मागे घेता येतील. इतर कोणत्याही प्रभागातील उमेदवारांना अर्ज मागे घेता येणार नाही. नगराध्यक्ष पदासह इतर कोणत्याही प्रभागात उमेदवारी अर्ज दाखल करता येणार नाही. यामुळे उमेदवारी अर्ज व मागे घेण्याबाबत सुरू असलेल्या विविध अफवांना पूर्णविराम मिळाला आहे.

**समृद्धी योगा व ट्रेकिंग ग्रुपचा उपक्रम**

# टेंभी डोंगरावर स्वच्छता अभियान उत्साहात



**नगर तालुका । रयत समाचार**

पिंपळगाव माळवी येथील ऐतिहासिक टेंभी खंडोबा मंदिरात नुकत्याच पार पडलेल्या चंपाषष्ठी यात्रेनंतर डोंगर परिसरात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा जमा झाला होता. या पार्श्वभूमीवर समृद्धी योगा व ट्रेकिंग ग्रुपतर्फे रविवार, ता. ३० नोव्हेंबर रोजी सकाळी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

ग्रुपमधील सुमारे ३५ ते ४० ट्रेकर्स सकाळी सहा वाजता टेंभी डोंगरावर एकत्र जमले. प्लास्टिक पिशव्या व हातमोजे परिधान करून त्यांनी डोंगरावरील विविध मार्गांवर पसरलेला कचरा गोळा करत परिसर स्वच्छ केला. अवघ्या दीड तासात संपूर्ण डोंगर परिसर स्वच्छ करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

समृद्धी ग्रुपच्या या उपक्रमाचे टेंभी खंडोबा सेवेकरी मंडळ तसेच ग्रामस्थांनी कौतुक केले.

# नगरपरिषद निवडणूक मतदानासाठी प्रशासन सज्ज

## प्रभाग क्र. ७ ‘ब’ची निवडणूक स्थगित

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी १ आणि सदस्य पदासाठी २२ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया पार पडत आहे. मंगळवार, ता. २ डिसेंबर २०२५ रोजी होणाऱ्या मतदानासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी श्रीकुमार चिंचकर यांनी दिली.

दरम्यान, प्रभाग क्र. ७ मधील जागा ‘ब’ साठीची निवडणूक प्रक्रिया ता. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्य निवडणूक आयोगाच्या परीपत्रकानुसार स्थगित करण्यात आली आहे

श्रीगोंदा नगरपरिषद क्षेत्रात एकूण २८,३२६ मतदार नोंदणीकृत असून यामध्ये १४,२५६ पुरुष आणि १४,०७० महिला मतदारांचा समावेश आहे. मतदारांच्या सोयीसाठी ३२ मतदान केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. मतदान प्रक्रियेसाठी एकूण १८६ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यापैकी ६ सेक्टर अधिकारी आणि २ राखीव कर्मचारी आहेत.

मतदान पथके मतदान केंद्रांवर सुरळीत पोहोचण्यासाठी ४ एसटी बसेस, १ मिनीबस आणि ७ कार वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सर्व मतदान केंद्रांवर राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध असून दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी रॅम्पची सोय, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्राथमिक उपचार पेटी तसेच मतदारांची वाढती गर्दी असल्यास अतिरिक्त बसण्याची सुविधाही देण्यात आली आहे.

निवडणुकीच्या पारदर्शकतेसाठी काल ता. १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजल्यानंतर प्रचारबंदी लागू केली. आचारसंहिता कक्षाचे कर्मचारी व दक्षता पथक नियमित पेट्रोलिंग करून नियमांचे पालन सुनिश्चित करत आहेत.

श्रीगोंदा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतर्गत मतदान ता. २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७.३० ते सायं. ५.३० या वेळेत होणार आहे. सर्व मतदारांनी आपल्या मतदान केंद्रावर उपस्थित राहून लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, मतमोजणीची प्रक्रिया ता. ३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता शासकीय धान्य गोदाम, पेडगाव रोड, श्रीगोंदा येथे पार पडेल, अशी माहितीही चिंचकर यांनी दिली.

# देवगड विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी साकारला राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा नकाशा

## संविधानिक मूल्ये, राष्ट्रीय एकात्मता बळकट करणारा अनोखा उपक्रम

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

हिवरगाव पावसा येथील देवगड विद्यालयातील विद्यार्थ्यांनी संविधान दिनानिमित्त देशभक्तीने ओथंबलेला, प्रेरणादायी आणि लक्षवेधी असा उपक्रम राबवित भारताचा भव्य नकाशा साकारला. विद्यार्थ्यांनी एकत्र येत तिरंग्याचे केशरी, पांढरा आणि हिरवा रंग मोहक रचनेत मांडले तर मधोमध अशोकचक्राची सुबक प्रतिकृती साकारण्यात आली. या उपक्रमातून राष्ट्रीय एकात्मता, संविधानिक मूल्ये आणि कर्तव्यनिष्ठेचा संदेश प्रभावीरीत्या देण्यात आला.

शाळेच्या मैदानावर शेकडो विद्यार्थी एकत्र येत तयार केलेल्या या भव्य नकाश्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधान विषयक जाणीव, राष्ट्रप्रेम, कर्तव्यपरायणता आणि एकता, बंधुतेचे महत्त्व अधिक दृढ झाले. कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांनी संविधान प्रास्ताविकाचे वाचन केले आणि घोषणांनी परिसर दणाणून गेला.



या विशेष उपक्रमाचे नियोजन मुख्याध्यापिका सुनंदा उगले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व समजावून सांगताना म्हटले की, ‘‘देशाचे भविष्य घडवण्यामध्ये युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळे आपले हक्क, अधिकार आणि कर्तव्य संरक्षित आहेत. याच संविधानाच्या बळावर आपला देश महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.’’

हा उपक्रम विद्यार्थ्यांना केवळ सहभागापुरता मर्यादित न ठेवता, त्यांच्या मनामध्ये देशभक्ती, संविधानप्रेम आणि एकता बंधुता रुजवणारा ठरला.

या भव्य नकाश्याचे आकर्षक हवाई चित्रीकरण करण्यासाठी सुयश नेहे, विशाल शिरसाठ आणि साहिल गोफणे यांनी शाळेसाठी आधुनिक ड्रोन कॅमेराची सुविधा उपलब्ध करून दिली. त्यांच्या सहकार्यामुळे उपक्रम जनमानसापर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचला

कार्यक्रमास उपस्थित सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व ग्रामस्थांनी उपक्रम पाहून समाधान व्यक्त केले. शाळेतील सर्व शिक्षकवर्ग आणि विद्यार्थ्यांनी एकत्रित प्रयत्न करून हा उपक्रम यशस्वी केला.

# पोटेंना थांबवण्यासाठी दिग्गज एकत्र

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

मनोहर पोटे यांच्या वाढत्या लोकप्रियतेला थांबवण्यासाठी तालुका पातळीवरील विविध नेतेमंडळी एकत्र आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. नगरपरिषद निवडणुकीत तब्बल चार पॅनल तयार झाल्याने आता खरी कसोटी मतदारांची ठरणार असून, विकास कामे अविरत सुरू राहण्यासाठी शिवसेनेचा पॅनल विजयी करा, असे आवाहन टिळक भोस यांनी प्रभाग क्र. ११ मधील प्रचारसभेत केले. या सभेत नगरसेवकपदाचे उमेदवार बाबूशेठ धुमाळ व भामाबाई कोथिंबिरे तसेच नगराध्यक्षपदाच्या उमेदवार शुभांगी पोटे यांच्या प्रचारार्थ ते बोलत होते.

टिळक भोस म्हणाले, ‘‘मनोहर पोटे यांनी मागील पाच वर्षांत विकास कामे करताना सर्वांना विश्वासात घेतले. मात्र, स्वकीय लोकांनीच विरोधाची भूमिका घेतली आणि या विरोधाला भाजपने खतपाणी घातले. या निवडणुकीत खरी लढत भाजप व शिवसेनेत आहे. इतर पॅनलमधील उमेदवारांना नगरसेवकपदासाठी चार अंकी मते मिळतील की नाही, हा प्रश्न आहे. ही सर्व धडपड मनोहर पोटे यांच्या विरोधासाठीच आहे. मतदारांनी याचा गांभीर्याने विचार करावा.’’



भोस पुढे म्हणाले की, ‘‘अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पॅनलमध्ये चार नेत्यांनी नगराध्यक्षपदासह २२ पैकी २० जागांची मागणी केली. माजी आमदार राहुल जगताप यांच्या वाट्यालाही जागा मिळाली नाही आणि मनोहर पोटे यांच्या वाट्याला तर एकही जागा आली नाही. या संपूर्ण घडामोडी पोटे यांच्या विरोधासाठी म्हणजेच भाजपच्या बाजूनेच राबवल्या गेल्या. परिणामी मनोहर पोटे यांनी शिवसेनेचा स्वतंत्र पॅनल उभा केला आणि उमेदवारांनीही याला मोठा प्रतिसाद दिला.’’

ते म्हणाले, ‘‘मनोहर पोटे यांना विरोध हा केवळ तालुक्यातील काही नेत्यांना श्रीगोंद्याच्या राजकारणावर पकड ठेवण्यासाठी आहे. पोटे यांच्या विरोधासाठी आमच्या खांद्यावर बंदूक ठेवण्याचा प्रयत्न झाला; मात्र आम्ही वेळेच सावध झालो आणि एकच उद्देश ठेवला; विकासासाठी पोटे यांना साथ देणे.’’ सभेत माजी नगराध्यक्ष मनोहर पोटे यांनीही मतदारांना संबोधित केले. ते म्हणाले, ‘‘प्रभाग क्र. ११ मधील कचरा व्यवस्थापनाची समस्या प्राधान्याने सोडवली जाईल. तसेच रस्ते व मूलभूत सुविधा उभारण्यात येतील.’’ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास खाते असल्याने श्रीगोंदा शहराचा विकास वेगाने होईल, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी नगराध्यक्षपदाच्या उमेदवार शुभांगी पोटे, तसेच उमेदवार बाबूशेठ धुमाळ व भामाबाई कोथिंबिरे यांना मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले. यावेळी अरविंद कापसे, जयश्री कोथिंबिरे, शिवसेना व पोटे यांचे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रचार थंडावला आज मतदान, उद्या मतमोजणी

## अभी नही, तो कभी नही


**श्रीरामपूर । शफीक बागवान**

राज्यभरासह श्रीरामपूर नगरपालिकेच्या निवडणुकीचा प्रचार काल थंडावला. निवडणुकीसाठी आज मतदान होणार असून उद्या मतमोजणी पार पडणार आहे. बहुचर्चित आणि प्रतिक्षेत असलेल्या राज्यभरातील नगरपालिका नगरपंचायतीच्या निवडणुकांसाठीचा प्रचार काल पूर्णपाने थंडवला आहे. आजपर्यंतच्या इतिहासात मतदानाअगोदर प्रचार करण्याची मुभा पहिल्यांदाच निवडणूक आयोगाने उमेदवारांना दिली हे या निवडणुकीचे खास वैशिष्ट्य समजले जात आहे. श्रीरामपूर नगरपालिकेसाठी अतिशय चुरशीची तसेच कसोटीची असलेली निवडणूक मानली जात आहे. निवडणुकीपूर्वी अनेकांचे अंदाज फेल ठरवत ही निवडणूक अटीतटीची आणि अंतिम टप्प्यात निर्णायक टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. काँग्रेसकडून करण ससाने, शिंदेसेनेकडून प्रकाश चित्ते, ठाकरेसेनेकडून अशोक थोरे, भाजपा-राष्ट्रवादी कडून श्रीनिवास बिहानी आणि समाजवादी पक्षाकडून जोएफ जमादार यांच्यासह इतरही अनेक उमेदवार आपले नशीब आजमावित आहेत. पक्षफुटी नंतर ही निवडणूक गावपातळीवर पहिल्यांदाच होत आहे. अभी नही तो कभी नही अशा प्रकारची ही निवडणूक लढविल्या जात आहे. राज्य मंत्रिमंडळात समावेश असलेल्या आणि अनेकांना आशा लागून राहिलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष अनुराधा आदिक यांची नसलेली उमेदवारी कोणाच्या पथ्यावर पडते याबाबत सर्वत्र उत्सुकता लागली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सचिव आणि प्रवक्ते अविनाश आदिक आणि अनुराधा आदिक यांचा वार्ड नंबर दोन हा बालेकिल्ला समजला जातो. तसेच स्वर्गीय जयंत ससाने आणि माजी नगराध्यक्षा राजश्री ससाने यांचाही हक्काचा मतदार म्हणून या प्रभागाकडे पाहिले जाते. आदिक यांची हक्काची असलेली व्होट बँक, मुस्लिम समाजाची मते कुणाकडे वळते त्यासाठी निवडणुकीचा निकाल पाहावा लागणार आहे. गेल्या अनेक वर्षांनंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी श्रीरामपूर शहरातील मुस्लिम बहुल भागात बैठका घेत या निवडणुकीचे रणशिंग फुंकले. दरम्यान नगराध्यक्ष पदासह नगरसेवकांसाठी होणारी ही निवडणूक त्यासाठी आज मतदान होत असून उद्या मतमोजणी होणार आहे. फिक्स नगराध्यक्ष आणि नगरसेवक कोण हे पाहण्यासाठी मतदान आणि निकालाकडे शहरवासी यांचे लक्ष लागले आहे.

**राहुरी कृषी विद्यापीठाला नवे नेतृत्व**

# डॉ. विलास खर्चे कुलगुरूपदी नियुक्त

**राहुरी । रयत समाचार**



येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे नवे कुलगुरू म्हणून डॉ. विलास खर्चे यांची नियुक्ती करण्यात आली. अकोला येथील पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात संशोधक संचालक म्हणून ते यापूर्वी कार्यरत होते. माजी कुलगुरू डॉ. पाटील यांच्या निधनामुळे ही जागा रिक्त झाली होती. त्या रिक्त पदावर राज्य शासनाने डॉ. खर्चे यांची नियुक्ती जाहीर केली असून विद्यापीठात नव्या नेतृत्वाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



**नेवासा मतदारसंघाचे महायुतीचे आमदार विठ्ठलराव लंघे यांना वडापावची भुरळ! (छाया विजय खंडागळे, सोनई)**

# शेंडेश्वर मंदिर सुशोभीकरण उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**पारनेर । विजय मते**

वडझिरे ग्रामस्थांच्या सहकार्याने गावचे आराध्य दैवत असलेल्या पवित्र शेंडेश्वर मंदिराच्या परिसरातील सुशोभीकरण काम अलीकडे पूर्ण झाले असून या उपक्रमामुळे मंदिर परिसर अधिक आकर्षक, सुव्यवस्थित आणि ग्रामस्थांसाठी सोयीस्कर बनला आहे. मंदिराभोवती बारा ब्रास पेव्हिंग ब्लॉक फरशी बसविण्यात आल्याने परिसराला स्वच्छता, सौंदर्य आणि सुविधा यांची जोड मिळाली आहे.

मंदिर परिसरात दहाव्याचे विधीसह विविध धार्मिक कार्यक्रम पार पडत असल्याने अधिक सोयींकरिता मंदिराच्या दक्षिण बाजूस ३५ बाय १६ फूट आकाराचे नवीन पत्राशेड उभारण्यात आले आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर ग्रामस्थांची वर्दळ असते. छायाच्छादित जागा उपलब्ध झाल्याने ये-जा करणाऱ्या सर्वांना मोठा दिलासा मिळाला आहे. हे सुशोभीकरण कार्य पूर्णपणे स्वइच्छेने आणि मनापासून करण्यात आले. देवराम मोरे यांनी आपल्या वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कै. दादाभाऊ नामदेव मोरे यांच्या स्मरणार्थ हे कार्य करविले, तर गंगाधर चौधरी यांनीही आपल्या वडिलांच्या कै. रामभाऊ नामदेव चौधरी यांच्या स्मरणार्थ या उपक्रमात सहभाग घेतला. दोन्ही कुटुंबीयांच्या निःस्वार्थ योगदानामुळे मंदिर परिसराचा संपूर्ण कायापालट झाला असून ग्रामस्थांनी या कार्याचे मनापासून स्वागत केले आहे. या उत्तम कार्याची दखल घेत वडझिरे ग्रामस्थांसह विविध मान्यवरांनीही दोन्ही कुटुंबीयांचे अभिनंदन केले. वसंतराव मोरे, बापूसाहेब तोडकर, मारुती रेपाळे, शिवाजीराव औटी, पोपटराव शेटे, संतोष दिघे, बापूसाहेब दिघे, डॉ. राजकुमार एरंडे, गुजानंद निघुट, ज्येष्ठ विधिज्ञ विनायक करकंडे तसेच सेवानिवृत्त शिक्षक हरिभाऊ चौधरी यांनी दोन्ही परिवारांचे अभिनंदन करून त्यांच्या समाजसेवेस हार्दिक शुभेच्छा दिल्या. या उपक्रमामुळे सामाजिक एकोपा, परंपरा आणि धार्मिक भावनेची मूल्ये अधिक दृढ झाल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. समाजसेवेच्या भावनेतून प्रेरित हा उपक्रम गावात आदर्श निर्माण करणारा ठरेल, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली. शेंडेश्वर चरणी प्रार्थना करत दोन्ही कुटुंबीयांनी पुढेही अशीच निःस्वार्थ सेवा समाजहितासाठी करावी, अशा शुभेच्छा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आल्या.



# राजकारणातील अजातशत्रू मनोहर जोशी

राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांची आज जयंती. अत्यंत गरीब कुटुंबात २ डिसेंबर १९३७ रोजी जन्मलेले मनोहर जोशी यांचा शिवसैनिक ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हा प्रवास थक्क करणारा आहे. नगरसेवक, महापौर, आमदार, विरोधी पक्ष नेते, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री ते लोकसभेचे अध्यक्ष असा त्यांचा राजकीय प्रवास आहे. शिवसेनेची स्थापना १९६६ साली झाली आणि पुढच्याच वर्षी म्हणजे १९६७ साली मनोहर जोशींनी शिवसेनेत प्रवेश केला म्हणजे शिवसेनेच्या पहिल्या फळीचे ते नेते होते. शिवसेनेच्या अनेक आंदोलनात त्यांनी हिरीरीने भाग घेतला होता. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे ते अत्यंत विश्वासू आणि निष्ठावंत साथीदार होते म्हणूनच १९९५ साली शिवसेना भाजप युतीचे सरकार सत्तेत आल्यावर बाळासाहेबांनी त्यांना थेट मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसवले. १४ मार्च १९९५ ते ३१ जानेवारी १९९९ या काळात ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यानंतर त्यांना केंद्रात मंत्रीपद आणि लोकसभेचे अध्यक्षपदही मिळाले. १९९९ ते २००२ या याकाळात ते अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय मंत्री होते तर २००२ ते २००४ या काळात ते लोकसभेचे अध्यक्ष होते. महाराष्ट्राच्या राजकारणात पाच दशकांहून अधिक काळ राहूनही त्यांचा कोणाशी वाद झाला नाही. त्यांच्या मितभाषी व प्रेमळ स्वभावाने त्यांनी सर्वांची मने जिंकली. विरोधी पक्षातही त्यांच्याविषयी आदराची भावना होती म्हणूनच त्यांना राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व असे म्हटले जाते. राजकारणाप्रमाणे व्यवसायातही त्यांनी यश मिळवले. कोहिनूर इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून महाराष्ट्रातील असंख्य तरुणांना प्रशिक्षित करून रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम त्यांनी केले. मनोहर जोशी यांनी काही पुस्तके लिहिली. त्यांनी लिहिलेले शिवसेना कालआजउद्या हे पुस्तक म्हणजे शिवसेनेचे चरित्र लेखन आहे. मनोहर जोशी हे शिवसेनेच्या ५० वर्षाच्या चढ उताराचे साक्षीदार होते. १९६७ साली शिवसेनेत प्रवेश केलेले मनोहर जोशी अखेरच्या श्वासापर्यंत शिवसेनेशी एकनिष्ठ राहिले. शिवसेना हाच त्यांचा श्वास, शिवसेना हाच त्याचा प्राण आणि बाळासाहेब हेच त्यांचे एकमेव दैवत होते. बाळासाहेब त्यांना पंत म्हणून संबोधत. मागील वर्षी २३ फेब्रुवारी २०२४ रोजी वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने बाळासाहेबांच्या मुशीत तयार झालेला एक कट्टर शिवसैनिक काळाच्या पडद्याआड गेला. राजकारणात असूनही सर्वांशी मैत्रीचे संबंध असणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व मनोहर जोशी यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

# श्रीरामपूरकरांनो, तुमचं भवितव्य तुमच्याच हाती!

**नऊ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर श्रीरामपूर नगरपालिकेची निवडणूक आज होत आहे. नगराध्यक्ष पदासाठी एक आणि १७ प्रभागांतील ३४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून यंदाच्या निवडणुकीत मोठी चुरस पाहायला मिळत आहे. शासनाने जनतेतून थेट नगराध्यक्ष निवडण्याचा निर्णय घेतल्याने या पदाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.**

काँग्रेसकडून करण ससाणे, तर काँग्रेसचे माजी नगरसेवक श्रीनिवास बिहानी हे भाजपाकडून उमेदवार आहेत. भाजपमध्ये दीर्घकाळ कार्यरत राहिल्यानंतर अंतर्गत मतभेदांमुळे पक्ष सोडलेले प्रकाश चित्ते हे शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार असून त्यांच्या समर्थनार्थ अनेक धार्मिक नेते पुढे सरसावले आहेत. शिवसेना (उबाठा) गटाचे अशोक थोरे तसेच इतर काही अपक्ष उमेदवारही नगराध्यक्ष पदासाठी मैदानात आहेत.

मागील निवडणुकीत जनतेतून थेट निवडून आलेल्या आणि पाच वर्षांच्या कार्यकाळात एकही भ्रष्टाचाराचा आरोप नसलेल्या माजी नगराध्यक्ष अनुराधा आदिक या पद खुले असूनही निवडणूक लढवत नाहीत, ही बाब नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे.

दरम्यान, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खा. सुजय विखे पाटील यांनी या निवडणुकीत सक्रिय लक्ष घातल्याने निवडणुकीची लढत अंतिम टप्प्यात अधिकच चुरशीची बनली आहे. आमदार हेमंत ओगले हे काँग्रेसकडून करण ससाणे यांच्या प्रचारात पुढाकार घेत आहेत, तर बिहानी यांच्या पाठीशी पालकमंत्र्यांची यंत्रणा उभी आहे. प्रकाश चित्ते हे पुन्हा एकदा हिंदुत्वाच्या मुद्द्यावर निवडणूक लढवत आहेत.

कधीकाळी स्वच्छ पाण्यासाठी प्रसिद्ध असलेले श्रीरामपूर आज पाणीटंचाई, दुरावस्थेतील रस्ते आणि वाढत्या सांडपाणी व्यवस्थापनाच्या समस्यांनी त्रस्त झाले आहे. ससाणे यांनी आणलेल्या भुयारी गटार योजनेची अंमलबजावणी राजकीय कारणांमुळे मागील नऊ वर्षांत प्रभावी झाली नाही. कोणत्याही प्रभागात विकास अपेक्षेपेक्षा कमी झाल्याने नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत.

नऊ वर्षांपूर्वीच्या तुलनेत यंदाची निवडणूक पूर्णपणे वेगळ्या वातावरणात होत आहे. शहराची विभागणी हिंदुत्वबिगर हिंदुत्व अशा दोन गटांत झाल्यामुळे विकासाचे मुद्दे दुय्यम ठरू लागले आहेत, अशी चिंता नागरिकांत व्यक्त होत आहे.



सलीमखान पठाण
९२२६४०८०८२
समाजसंवाद

शहरात मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिक्रमणांमुळे लहान व्यापाऱ्यांचे व्यवसाय उद्ध्वस्त झाले. वाहतूक कोंडी वाढली. नियोजनबद्ध शहर म्हणून ओळख असलेल्या श्रीरामपूरमध्ये नागरिकांनीच नियम मोडल्यामुळे प्रशासनाला कठोर कारवाई करावी लागली. अंमलबजावणीदरम्यान काही ठिकाणी अन्यायही झाला, परंतु मागील वर्षभरात या समस्येवर कोणतेही ठोस उपाय झाले नाहीत. आता निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष आश्वासनांची मालिका देताना दिसत आहेत.

मागील १५२० वर्षांपासून शिवछत्रपतींच्या पुतळ्याच्या मुद्द्यावर राजकारण पेटत होते. पालकमंत्र्यांनी निधी देऊन व जागेचा प्रश्न सोडवून हा वाद कायमचा निकाली काढला. भव्य पुतळा उभारल्याने या मुद्द्यावरचे राजकारण संपुष्टात आल्याचे दिसत आहे.

शहरात जातीय विभागणीचे राजकारण वाढत असल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे. ओपन, ओबीसी, एससी, एसटी अशा विभागणीवर राजकीय गटांचे फूटपाडू राजकारण तीव्र झाले आहे. प्रत्यक्षात शहरातील लोक परस्परांवर अवलंबून आहेत आणि बहुतेक व्यवसाय जातीनिरपेक्ष आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीवर जातीय प्रश्न तापवणे चुकीचे असल्याचे नागरिकांचे मत आहे.

लोकशाहीमध्ये विकास करणे ही सत्ताधाऱ्यांची जबाबदारी आहे. ''निधी आम्हीच आणू'', ''विरोधकांना निधी मिळणार नाही'' अशा विधानांनी लोकशाहीची दिशा चुकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या अधिकारांचे संरक्षण करणे ही प्रत्येक सत्ताधाऱ्याची जबाबदारी आहे.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा वॉर्ड क्र. २ मधील दौरा चर्चेत असून, या भागातील मतपरिवर्तन होत आहे का, हे उद्याच्या मतदानातून स्पष्ट होणार आहे.

रयत समाचार

बाजारपेठेची बिकट अवस्था, बेरोजगारी, रस्ते, पाणी, सांडपाणी यांसारख्या प्रश्नांवर उपाय शोधण्यासाठी कणखर आणि सर्वसमावेशक नेतृत्वाची गरज भासते. गोविंदराव आदिक आणि जयंत ससाणे यांच्या नंतर शहराला दिशा देणारे नेतृत्व उरले नाही, अशी भावना नागरिकांत आहे. शहराची सर्वांगीण माहिती असलेले, सर्व समाजघटकांना जोडून ठेवणारे नेतृत्व निवडण्याची वेळ आता आली असल्याचे मत विविध स्तरांवरून व्यक्त होत आहे.

# मैदानी खेळ म्हणजे 'औषध' - न्यायाधीश शेंडे

## अहमदनगर बार असोसिएशनचा वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात



**अहमदनगर । रयत समाचार**

अहमदनगर बार असोसिएशनतर्फे आयोजित वार्षिक क्रीडा महोत्सव २०२५ वाडियापार्क क्रीडा संकुलात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांच्या हस्ते झाले. उद्घाटन सोहळ्यास जिल्ह्यातील विधीज्ञ, सरकारी वकील, बार असोसिएशनचे पदाधिकारी तसेच वकील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला वकिलांचाही उत्स्फूर्त सहभाग लाभला.

उद्घाटन सोहळ्यावेळी जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील, सरकारी वकील अनिल घोडके, बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजेश कातोरे, उपाध्यक्ष ॲड. वैभव आघाव, सचिव ॲड. संदीप बुरके, महिला सचिव ॲड. जया पाटोळे, खजिनदार ॲड. अनुराधा येवले, सहसचिव ॲड. मनिष केळगंद्रे, ज्येष्ठ विधीज्ञ सुमतीलाल बलदोटा, अशोक बार्शीकर, बाजीराव बोठे, अमितेश झिंजुर्डे, वृषाली तांदळे, सचिन देवा पाठक, सुरेश भोर, कृष्णा झावरे आदी मान्यवर उपस्थित होते.

बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजेश कातोरे म्हणाले, बार असोसिएशनच्या परंपरेने दरवर्षी हा क्रीडा महोत्सव उत्साहात साजरा होतो. वकिलांचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य, तसेच आपसातील एकोपा वृद्धिंगत व्हावा, हा महोत्सव आयोजित करण्यामागील उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आरोग्यासाठी आणि तणावमुक्त जीवनासाठी मैदानावर उतरावे, हाच आमचा विचार असल्याचे त्यांनी नमूद केले.

क्रीडा महोत्सवात वाडियापार्कमध्ये धावण्याच्या विविध गटांतील आकर्षक स्पर्धा, क्रिकेट सामने, बॅडमिंटन आणि व्हॉलीबॉल स्पर्धा उत्साहात पार पडल्या. कॅरम व बुद्धिबळ स्पर्धांमध्ये शांतता, एकाग्रता आणि रोमांचक क्षण अनुभवण्यास मिळाले. खेळांमध्ये वकील बांधवांसह महिला वकिलांनीही उल्लेखनीय सहभाग नोंदवला.

जीवनात मैदानी खेळ हे औषधाप्रमाणे असतात. खेळामुळे ताण-तणाव दूर होतो, सकारात्मक दृष्टिकोन वाढतो आणि कामाचा उत्साह टिकून राहतो. महिला वकिलांचा मोठा सहभाग हा कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. खेळात जिंकणे हा उद्देश नसून सहभाग, शिस्त आणि टीम स्पिरिट ही महत्त्वाची मूल्ये असल्याचेही त्यांनी नमूद केले.

– अंजू शेंडे,
प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश



# तंटामुक्ती अध्यक्षपदी गोरक्ष नवघरे

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

तालुक्यातील लोळेगाव येथील महात्मा गांधी तंटामुक्त ग्रामपंचायतीच्या तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते गोरक्ष मधुकर नवघरे यांची निवड करण्यात आली. पहिले अध्यक्ष गोकुळ पठाडे यांनी राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी ही निवड करण्यात आली. लोळेगाव ग्रामपंचायतीला यापूर्वी महात्मा गांधी तंटामुक्त गाव पुरस्कार मिळालेला आहे.

या निवडीसंदर्भात ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच सुनिता काळे होत्या. ग्रामविकास अधिकारी पंडित भाऊसाहेब यांनी विविध विषयांचे सविस्तर वाचन ग्रामसभेसमोर केले. तंटामुक्ती समिती अध्यक्षपदासाठी गोरक्ष नवघरे यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

गोरक्ष नवघरे हे सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत असून त्यांचे योगदान गावासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे ग्रामस्थांनी नमूद केले. सूचक म्हणून भानुदास काळे आणि अनुमोदक म्हणून तुकाराम ठुबे यांनी प्रस्ताव मांडला.

निवडीनंतर गोरक्ष नवघरे म्हणाले, गावातील छोटे-मोठे वाद लोकसहभागातून आणि तडजोडीने सोडवण्यावर भर दिला जाईल. गावातील शांतता, सुव्यवस्था आणि सौहार्द टिकून राहावे, कोणीही त्रासात पडू नये आणि आर्थिक नुकसान टाळले जावे, तसेच न्यायालयीन प्रकरणांची संख्या कमी होण्यासाठी गावपातळीवरच तंटे सोडवण्याचा प्रयत्न केला जाईल.

नवीन अध्यक्षांची बिनविरोध निवड होताच ग्रामस्थांनी त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी सरपंच सुनीता काळे, सोन्याबापू देवढे, पाणी वापर संस्थेचे चेअरमन गोकुळ पठाडे, काटकर स्वामी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप देवढे, दादासाहेब काळे, भाऊराव ठुबे, ग्रामपंचायत सदस्य सुधीर काळे, ऋषिकेश काळे, तुकाराम ठुबे, दादासाहेब डोंगरे, अविनाश काते, पांडुरंग काते, गोरक्ष पठाडे, गणेश ठुबे, नवनाथ नवघरे, शंकर शिनगारे, ज्ञानेश्वर नवघरे, राजू पठाडे, अशोक काते आदी ग्रामस्थ उपस्थित होते.रयत समाचार

# ग्रामीण वास्तवाला साहित्यिक रूप देणारे 'आनंदयात्री' - डॉ. धोंगडे

## डॉ. आनंद यादव ९० व्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम संपन्न

**पिंपरी । रयत समाचार**

स्व. दत्तोपंत म्हसकर सार्वजनिक विश्वस्त संस्था सभागृह, निगडी प्राधिकरण येथे समरसता साहित्य परिषद आणि डॉ. आनंद यादव अभ्यास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'आनंदयात्री' हा डॉ. आनंद यादव यांच्या ९०व्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिका डॉ. अश्विनी धोंगडे होत्या. यावेळी पद्मश्री गिरीश प्रभुणे, लेखिका प्रा. डॉ. कीर्ती मुळीक, ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक हरिहर कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. धोंगडे म्हणाल्या, डॉ. आनंद यादव यांनी ग्रामीण वास्तवाचा अस्सल चेहरा शहरी वाचकांसमोर आणला. चित्रमय शैली, ग्रामीण बोली आणि फुले-गांधी विचारांची सांगड त्यांच्या साहित्यशक्तीतून दिसते. त्यांनी पुढे 'ग्रामीण साहित्य चळवळीला चालना देण्याचे मोठे कार्य यादवांनी केले असून, कसोटीच्या काळात साहित्यिकांनी त्यांना साथ न दिल्याची खंत आजही जाणवते,' असे सांगितले.

डॉ. कीर्ती मुळीक यांनी, नागरी आणि ग्रामीण साहित्याची दरी मिटवण्याचे कार्य यादवांनी केले. आज त्यांच्या अभ्यास मंडळाची अधिक गरज



भासते, असे मत व्यक्त केले. हरिहर कुलकर्णी यांनी तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात ग्रामीण विद्यार्थ्यांवर मराठी शाळा बंद पडण्याच्या परिणामांची खंत व्यक्त केली.कार्यक्रमाची सुरुवात अखंड भारतमाता, राष्ट्रीय महापुरुष आणि डॉ. आनंद यादव यांच्या प्रतिमापूजनाने झाली. सुहास घुमरे यांनी सादर केलेली 'ती पोर झिम्मा खेळते' ही ग्रामीण ढंगातील कविता विशेष दाद मिळवून गेली.

समरसता साहित्य परिषद पिंपरी-चिंचवड शाखाध्यक्षा मानसी चिटणीस यांनी प्रास्ताविक केले. यावेळी पुणे महानगर शाखेच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीचा सत्कार करण्यात आला. अभिवाचन सत्रात हेमंत जोशी, मंगला पाटसकर, दत्तात्रय मस्के, ऋचा कर्वे, अशोक होनराव, श्रद्धा चटप यांनी यादव यांच्या रचनांचे अभिवाचन केले.

तसेच माधवी देवळाणकर यांनी 'सासुरवाशीण' कथेचे, तर मोनिका बागडे यांनी मानसी चिटणीस यांनी यादवांना लिहिलेल्या पत्राचे अभिवाचन केले. कविवर्य चंद्रकांत चाबुकस्वार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कविसंमेलनात सोमनाथ सुतार, सोमनाथ टकले, जनार्दन धुमाळ, वैशाली गावंडे, राजेश चौधरी, संजय माने या कवींनी ग्रामीण बोलीतील कवितांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

संयोजनात शोभा जोशी, राजेंद्र भागवत, नीलेश शेंबेकर, जयश्री श्रीखंडे, सुप्रिया लिमये, स्वाती भोसले, पुष्कर भातखंडे, प्रदीप गांधलीकर यांचे सहकार्य लाभले. स्नेहा पाठक आणि उज्ज्वला केळकर यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले; तर डॉ. जनार्दन भोसले यांनी आभार मानले. कार्यक्रमाची सांगता सुप्रिया लिमये यांच्या 'वंदेमातरम्'च्या सुमधुर सादरीकरणाने झाली.

यादवांच्या वास्तववादी लेखनामुळे मराठा शेतकरी समाजासह बहुजन समाजातील लेखकांना प्रेरणा मिळाली. ग्रामीण वाचकवर्ग निर्माण करण्याचे श्रेय त्यांना जाते. **– पद्मश्री गिरीश प्रभुणे**

# वनोपज परवाना अधिकार ग्रामसभांना

**मुंबई । रयत समाचार**

वनहक्क कायदा २००६, नियम २००८ व २०१२ तसेच पेसा कायदा १९९६नुसार ग्रामसभांना असलेले गौण वनोपज वाहतूक परवाना निर्गमनाचे अधिकार प्रत्यक्षात अमलात आणण्यासाठी आदिवासी विकास विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यानुसार गौण वनोपज वाहतूक परवाने जारी करण्याचा पूर्ण अधिकार आता थेट ग्रामसभांना देण्यात आला आहे. यापूर्वी हे परवाने वनविभागाकडून दिले जात होते. मात्र नवीन कार्यपद्धतीनुसार ग्रामसभा स्वतःच परवाना छापून, क्रमांक जारी करून आणि निर्गमित करून त्याची माहिती संबंधित वन कार्यालयास कळवणार आहेत. यामुळे ग्रामसभांना दिलेले अधिकार बळकट होऊन आदिवासी व वननिवासी समाजाला स्वायत्तता मिळणार आहे.

**शासन निर्णयातील प्रमुख बाबी :** गौण वनोपज वाहतूक परवाना निर्गमनाचा अधिकार पूर्णपणे ग्रामसभांकडे. वनविभाग यापुढे अर्ज स्वीकारणार नाही. ग्रामसभेने जारी परवान्याचा क्रमांक वन कार्यालयास कळविणे बंधनकारक. परवान्याची प्रत बिटगार्ड आणि वन कार्यालयात सादर करणे आवश्यक. संभ्रम असल्यास निर्णय जिल्हास्तरीय वनहक्क समिती घेईल; ग्रामसभेचे अधिकार अबाधित राहतील. पुढील काळात कोड व डिजिटल परवाना प्रणाली लागू करण्याची मुभा.

या निर्णयामुळे पेसा क्षेत्रातील ग्रामसभा अधिक सक्षम बनतील व आदिवासी समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळेल. समुदायाधिकार प्रत्यक्षात येण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा असल्याचे प्रकल्प अधिकारी प्रदीप बा. देसाई यांनी सांगितले.

# शिवसेनेतर्फे इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती ४ डिसेंबरला

**अहमदनगर । रयत समाचार**

महानगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ पार्श्वभूमीवर शिवसेनेतर्फे(उद्धव बाळासाहेब ठाकरे)अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती गुरुवार, दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आल्या आहेत. या मुलाखती कोहिनूर मंगल कार्यालय, सावेडी, अहिल्यानगर येथे सकाळी १०.३० वाजता होतील. या संदर्भातील माहिती शिवसेनेचे (ऊबाठा)महानगरप्रमुख किरण काळे आणि दक्षिण जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी यांनी सोशल मीडियावर प्रसिद्ध केली आहे. इच्छुक उमेदवारांनी आपल्या समर्थकांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असं आवाहन करण्यात आलं आहे. उमेदवारीसाठी इच्छुक असलेल्या शिवसैनिकांनी अथवा उमेदवारांनी मुलाखतीसाठी आपले नाव ९९२२९ १४२६४ या क्रमांकावर नोंदवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी उमेदवारांची निवड करण्याची ही महत्त्वाची प्रक्रिया असल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. अहिल्यानगर शहर, नगर तालुका, पारनेर, श्रीगोंदा, राहुरी, पाथर्डी, शेवगाव, कर्जत व जामखेड या मतदारसंघातील कार्यकर्ते व इच्छुकांना मुलाखतीसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.